# शासकीय तंत्रनिकेतन मुंबई

(महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था )
४९,खेरवाडी ,अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१
दूरध्वनी : ९०२२९००१९२५ संकेतस्थळ : www.gpmumbai.ac.in
ई-मेल: gpmumbai@gpmumbai.ac.in
प्राचार्य ई-मेल: Principal.gpmumbai@dtemaharashtra.gov.in
Principal@gpmumbai.ac.in
कार्यालय ई-मेल : office.gpmumbai@dtemaharashtra.gov.in

जा.क्र./शा.तं.नि.मु./विज्ञान/२०२१/४९ दिनांक :-०८/१०/२०२१

**प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी प्रवेश २०२१-२२**

**संस्था स्तरावरील अतिरिक्त प्रवेश फेरी**

शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेश फेरी नंतरच्या संभाव्य रिक्त जागांसाठी संस्था स्तरावरील अतिरिक्त प्रवेश फेरी खलील प्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यानी या संधीचा लाभ घ्यावा .

| | | |
|---|---|---|
| ०१ | प्रथम वर्ष | दि.१४ ऑक्टोबर २०२१ |
| ०२ | थेट द्वितीय वर्ष | दि.१८ ऑक्टोबर २०२१ |

**प्रवेशासाठी पात्र विद्यार्थी**

१) ज्या विद्यार्थ्यानी या पूर्वी प्रवेशप्रक्रिये मध्ये भाग घेतला होता परंतु त्यांना प्रवेश मिळालेला नाही असे सर्व विद्यार्थी
२ ) तसेच ज्या विद्यार्थ्यानी प्रवेश घेतलेला आहे परंतु त्यांना शाखा बदल करावयाचा आहे असे सर्व विद्यार्थी
३) तसेच ज्या विद्यार्थ्यानी नोन कॅप साथी नोंदणी केलेली आहे असे सर्व विद्यार्थी या फेरी साथी पात्र राहतील
४) ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही असे विद्यार्थीही नोन कॅप साठी नोंदणी करू शकतात.

**प्रवेश फेरीचा कालावधी कालावधी खालीलप्रमाणे आहे**

| | |
|---|---|
| प्रवेश फेरीचा दिनांक | **प्रथम वर्ष** १४ ऑक्टोबर २०२१ |
| | **थेट द्वितीय वर्ष** १८ ऑक्टोबर २०२१ |
| संस्थेत नाव नोंदणी | सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजे पर्यन्त |
| गुणवत्ता यादी जाहीर करणे | दुपारी ०२.३० वाजता |
| संस्थेतील प्रवेश निच्छिती | दुपारी ०२.४५ वाजता |

**अतिरिक्त फेरीची नियमावली**

**१)** या संस्था स्तरीय फेरी मध्ये केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त असलेल्या व होणाऱ्या जागा भरण्यात येणार आहेत

२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान रिक्त जागा ज्या प्रवर्गा करिता राखून ठेवलेली आहे त्याच प्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल. तदनंतर जागा रिक्त राहिल्यास त्या जागा गुणवत्तेच्या आधारे सर्वांकरिता खुल्या होतील

३) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांखेरीज इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या संस्था स्तरीय प्रवेश फेरी मध्ये प्रवेश मिळाल्यास कोणतीही शिष्य वृती योजना लागू होणार नाही.तसेच संस्थेची प्रवेश फी ( प्रथम वर्ष -रु १००७६/- व थेट द्वितीय वर्ष रु - १६०५६/- ) online पद्धतीने ( ATM / DEBIT / G-PAY ) पूर्ण भरायची आहे.

४) विद्यार्थ्यानी इतर संस्थेत प्रवेश घेतलेला असल्यास तेथील प्रवेश रद्द करण्याची ऑनलाइन कार्यवाही स्वतः करावयाची असून या संस्थेची ती जबाबदारी असणार नाही .

५) प्रवेश निश्चित करताना पूर्ण फी ,मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतींचा एक संच सोबत आणावा.

६) ज्या विद्यार्थ्यानी या पूर्वी प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिये साठी नोंदणी व अर्ज केलेला नाही अशा विद्यार्थ्यानी संस्थेत येण्यापूर्वी www.dtemaharashtra.gov.in संकेत स्थळावर नाव नोंदणी व अर्ज भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यानी सर्व मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतींचा एक संच घेऊन संस्थेत उपस्थित रहावे.

**७) प्रथम वर्षासाठी दिनांक १४/१०/२०२१ नंतर रिक्त झालेल्या /असलेल्या जागांसाठी दिनांक २०/१०/२०२१ रोजी पुन्हा संस्था स्तरावर वरील प्रमाणेच प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येईल.**

**८) थेट द्वितीय वर्षासाठी दिनांक १८/१०/२०२१ नंतर रिक्त झालेल्या /असलेल्या जागांसाठी दिनांक २०/१०/२०२१ रोजी पुन्हा संस्था स्तरावर वरील प्रमाणेच प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येईल.**

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन,मुंबई